कौ.हिं.अर्ज कमांक- २९/२०२२
MHAM180011532022
अनिता व इतर वि. उमेश व इतर

**कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदयाचे कलम २३ अंतर्गत निशाणी कमांक ०५ वरील आदेश**

(दिनांक ०१/१०/२०२२ )

१. अर्जदाराने सदरचा अर्ज कौंटुबिंक हिंसाचारा पासुन महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ प्रमाणे अंतरिम आदेश होण्याबाबत दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे सदरचा अर्ज व अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदयाचे कलम १२ अन्वये दाखल केलेल्या अर्जाचे व त्यावरील गैरअर्जदाराने **नि.क. १३** व १७ अन्वये दाखल केलेले लेखी उत्तराचे अवलोकन केले. अर्जदारांतर्फे ॲड. श्री. डब्लु.आर. खासबागे तर गैरअर्जदारांतर्फे ॲड. श्री. पी.डी. वाढीवे यांचा युक्तीवाद ऐकला.

३. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क १ चे गैरअर्जदार क. १ सोबत दि. ११.०७.२०१९ रोजी लग्न झाले. लग्नानंतर अर्जदार क. १ ही गैरअर्जदारांच्या संयुक्त कुटुंबात नांदावयास गेली. गैरअर्जदार क. २ व ३ हे तिचे सासु-सासरे आहेत. लग्नानंतर अर्जदार क. १ ला गैरअर्जदार क. १ ने साधारणतः एक महिना व्यवस्थीत वागविले. त्यानंतर ती गैरअर्जदार क. १ पासुन गरोदर राहिली. तेव्हा तिचे इच्छेविरुध्द तिला तिच्या माहेरी पाठवुन दिले. दि. ०९.०५.२०२० ला तिचे बाळंतपण होउन अर्जदार क. २ ही मुलगी नामे यशस्वी जन्माला आली. तिचे बाळंतपण झाल्यानंतर तिने अनेकदा गैरअर्जदारांना भेटी करीता बोलाविले असता कोणीही तिला भेटायले आले नाही. शेवटी अर्जदार क. १ ने बाळंतपणानंतर अंदाजे ४ महीन्यांनी गैरअर्जदार क. १ कडे नांदविण्याच्या दृष्टीने घ्यायावयास बोलाविले तेव्हा गैरअर्जदार क. १ ने न येता त्याचे आईवडीलांना अर्जदारांना घ्यायावयास पाठविले. त्यानंतर अर्जदार क. १ ही

अर्जदार क. २ ला घेवुन गैरअर्जदारांकडे नांदावयास गेली. तेव्हा तिने घ रातील संपुर्ण कामधंदा करावा अशी गैरअर्जदारांची अपेक्षा होती. परंतु अर्जदार क. १ ला लहान बाळ असल्यामुळे तिला घरातील संपुर्ण कामधंदा करणे अशक्य होते. त्यामुळे गैरअर्जदार क. १ चे वडील व आई गैरअर्जदार क. २ व ३ हे तिचा शारिरीक, मानसीक व आर्थिक छळ करीत होते व गैरअर्जदार क. १ हा सर्व बांबीकडे दुर्लक्ष करीत होता. एवढेच नव्हेतर गैरअर्जदार क. १ हा घरामध्ये जीवनावश्यक वस्तु सुध्दा आणित नव्हता. त्यामुळे गैरअर्जदारांना बरेचदा उपाशी सुध्दा राहावे लागत होते. गैरअर्जदार क. १ चे आईवडील अर्जदार क. १ विषयी गैरअर्जदार क. १ कडे चुगल्या लावत असे. गैरअर्जदार क. १ सुध्दा तिला मानसीक व शारिरीक त्रास देत होता. सर्व ही गैरअर्जदार हे कौटुंबिक कट करुन अर्जदार क. १ ला घ राच्या बाहेर हाकलण्याचा सतत प्रयत्न करीत असे. एवढेच नव्हेतर अर्जदार क. १ ला लहान बाळ असतांनाही तिने शेतीचे कामावर जावे याकरीता तसेच तिने अर्जदार क. २ ला घेवुन तिचे माहेरी निघुन जावे याकरीता प्रयत्न करीत होते. गैरअर्जदार हे तिला सतत म्हणत असे की, जर अर्जदार क. १ ही बाळाला घेवुन माहेरी जात नसेल तर तिच्या जीवाचे कमी जास्त झाल्यास आम्ही जबाबदार राहणार नाही. शेवटी गैरअर्जदार क. १ ने तिचे माहेरी निरोप पाठवुन तिच्या भावास घ्यायवास बोलाविले. त्यामुळे तिचा भाउ राजेंद्र वघाळे हा दि. ०८.०२.२०२१ रोजी नरखेड येथे आला व गैरअर्जदांराना समजाविण्याचा प्रयत्न केला. परंतु गैरअर्जदार हे ऐकुण घेण्याच्या मनस्थीतीत नव्हते. शेवटी अर्जदार क. १ ला बळजबरीने तिच्या इच्छेविरुध्द लहानबाळासह माहेरी पाठवुन दिले. तेव्हा पासुन ती तिच्या लहान बाळाला घ ेवुन माहेरी शेघाट (मलकापुर) येथे राहत आहे. यानंतर गैरअर्जदांरानी तिला नांदविण्याच्या दृष्टीने कोणताही प्रयत्न केला नाही. शेवटी तिने तिच्या वकीलामार्फत नोटीस पाठवीली व नांदविण्यास घेवुन जावे असे कळविले.

तरी पंरतु गैरअर्जदारांकडील कोणीही अर्जदारांना नांदविण्याच्या दृष्टीने ध ोण्याकरीता आले नाही व खोटेनाटे नोटीसचे उत्तर पाठविले. गैरअर्जदार क. १ हा त्याच्या आईवडीलांसोबत एकटाच राहतो. त्यांच्याकडे ३ एकर ओलीताखाली शेती असुन ६०० मोंसबीची बहर देणारी झाडे आहत. तसेच गैरअर्जदार हे दुस-याचे शेत वाहतात त्या शेतामध्ये कापुस व तुर इ. पिके दरवर्षी घेतात व दरवर्षी ७ लाख रुपये उत्पन्न घेतात. त्यामुळे अर्जदाराने कौटूंबिक हिंसाचारापासुन महिंलाचे संरक्षण कायदयांतर्गत सदरहु प्रकरण दाखल करुन अंतरिम आदेश होण्याकरीता सदर अर्ज दाखल केला.

४. संरक्षण अधिकारी यांचा कौटुंबिक घटना अहवाल बोलविण्यात आले. संरक्षण अधिकारी यांचे नि.क. २० नुसार कौटुंबिक घटना अहवालाचे अवलोकन केले.

५. गैरअर्जदारांनी प्रस्तुत प्रकरणात हजर होउुन **नि.क. १३ व १७** अन्वये त्यांचे लेखी उत्तर दाखल केले. गैरअर्जदारांनी अर्जदार क. १ व गैरअर्जदार क. १ चा विवाह कबुल केला. तसेच गैरअर्जदारांना अर्जदारांशी असलेले नातेसंबंध देखील कबुल केले. अर्जदार क. १ ही विवाहानंतर गैरअर्जदार क. १ कडे नांदावयास त्यांच्या गावी गेली व त्यांच्या कुटुंबात तिचे संपुर्ण वैवाहिक कर्तव्य पार पाडत होती हे देखील कबुल केले. तसेच दि. ०९.०५.२०२० ला अर्जदार क. १ ला अर्जदार क. २ ही मुलगी जन्माला आली हे देखील कबुल केले. मात्र कौटूंबिक हिंसाचाराच्या घटना नाकारल्या. गैरअर्जदारांच्या मते, अर्जदार क. १ चे गैरअर्जदार क. १ सोबत लग्न झाल्यानंतर ती त्यांच्या संयुक्त कुटुंबात नांदावयास आली व दि. ०९.०५. २०२१ ला अर्जदार क. १ हीने मुलगी नामे यशस्वी वैदय हिला जन्म दिला. सदरच्या अर्जदार क. १ च्या डिलेव्हरीसाठी लागणारा खर्च रुपये १० हजार गैरअर्जदार क. १ च्या मोठया भावाने अर्जदार क. १ च्या आईला दिला.

तसेच मुलगी मुळनक्षत्रात जन्माला आल्यामुळे नामकरणविधी करण्यात आला व त्यासाठी सुध्दा गैरअर्जदार क. १ व त्याच्या नातेवाईकांनी सोन्याची अंगठी व रुपये ५ हजार घेवुन अर्जदार क. १ च्या माहेरी गेली व अर्जदार क. १ ला दिले. त्यानंतर अर्जदार क. १ ही गैरअर्जदारांकडे नांदावयास सासरी परत आली. परंतु तिच्या स्वभावामध्ये अचानकपणे बदल घडून आला व ती शुल्लक कारणावरुन गैरअर्जदार क. १ सोबत नेहमी वाद उपस्थित करायची. पती पत्नी मध्ये झालेल्या वादाबद्दल गैरअर्जदार क. २ व ३ यांना माहिती नाही. अर्जदार क. १ ही नेहमी गैरअर्जदार क. १ ला त्याच्या आईवडीलांपासुन वेगळे राहण्याचा तगादा लावायची व नेहमी वाद उपस्थीत करायची. त्यामूळे गैरअर्जदार क. २ व ३ यांनी अर्जदार क. १ व गैरअर्जदार क. १ यांचा संसार व्यवस्थीत पार पाडावा म्हणुन त्यांच्या राहते घरी वरच्या खोलीमध्ये वेगळे ठेवले व त्यांना लागणा-या सर्व जिवनावश्यक वस्तु पुरविल्या. त्यानंतर वेगळे राहुन सुध्दा अर्जदार क. १ ने गैरअर्जदार क. १ सोबत वाद घालणे थांबविले नाही व नेहमी तुझे घर लहान आहे तु माझ्या गरजा पुर्ण करु शकत नाही, तु साधी गाडी सुध्दा चालवू शकत नाही असे म्हणुन वाद उपस्थीत करायची व अश्लील भाषेत शिवीगाळ करायची व भांडण उपस्थित करायची व नेहमी गैरअर्जदार क. १ ला तिच्या माहेरी जाण्याकरीता जबरदस्ती करायची त्यामुळे गैरअर्जदार क. १ हा अर्जदार क. १ च्या माहेरी शेघाट येथे राहण्याकरीता गेला. तेथे राहत असतांना गैरअर्जदार क. १ ची प्रकृती बिघडली व त्याला कोणतेही दवाखाना न करता अर्जदार क. १ ने गैरअर्जदार क. १ ला नरखेड येथे त्यांच्या रहाते घरी आणुन दिले व दुस-या दिवशी गैरअर्जदार क. १ कडील सर्व मंडळी शेतात गेले असता कोणालाही न सांगता भाउ राजेंद्र ला बोलावुन घरून सोन्याचे व चांदीचे आभुषण कपडे घेवुन माहेरी निघुन गेली व फोन करुन गैरअर्जदार क. १ ला मला सोडचिठ्ठी पाहिजे असे

सांगीतले. गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ वर कोणताही घरगुती हिंसाचार केला नाही. तर ती स्वमर्जीने तिचे माहेरी राहत आहे. गैरअर्जदार क्र. १ हा मोलमजुरीचे काम करतो. तसेच त्याच्यावर त्याच्या म्हाता-या आईवडीलांची जबाबदारी आहे. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार क्र. १ ला नांदवावयास तयार असुन अर्जदार क्र. १ ने केलेल्या मागण्या पुरवण्यास असमर्थ असल्याचे कथन करुन सदरहु अर्ज खारिज करण्याची विंनती केली.

६. दोन्ही पक्षांचे परस्पर विरोधी कथन व दोन्ही पक्षाचे विधीज्ञांचे युक्तीवाद ऐकुन माझ्या विचारार्थ खालील मुद्दे उपस्थीत झाले व त्यावर मी माझे कारणमिमांसेसह निष्कर्ष खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ चा कौटुंबिक हिंसाचार केला हे अर्जदार क्र. १ ने प्रथमदर्शनी सिध्द केले काय ? | ... होय |
| २. | अर्जदार अंतरिम आदेश मिळण्यास पात्र आहे काय? | ... अशंतः होय |
| ३. | आदेश काय? | ... अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

७. अर्जदाराने दाखल केलेला अर्ज व तिचे शपथपत्रं पाहिले असता गैरअर्जदार हे तिला घराच्या बाहेर हाकलण्याचा सतत प्रयत्न करुन तिचा शारिरीक, मानसीक व आर्थीक छळ करीत असल्याबाबतीत तिच्या मुख्य अर्जात विस्तृतपणे विवेचन केले आहे. गैरअर्जदारांनी अर्जदारांसोबत असलेले नातेसंबंध मान्य केले आहे. गैरअर्जदारांनी त्यांच्या लेखी जबाबात अर्जदाराचे कौटुंबिक हिंसाचाराबाबतचे म्हणणे नाकारले. अर्जदार क्र. १ ने तिच्या अर्जात असे कथन केले की, लग्नानंतर अर्जदार क्र. १ ला गैरअर्जदार क्र. १ ने

साधारणतः एक महिना व्यवस्थीत वागविले. त्यानंतर ती गैरअर्जदार क. १ पासुन गरोधर राहिली. तेव्हा तिचे इच्छेविरुध्द तिला तिच्या माहेरी पाठवुन दिले. दि. ०९.०७.२०२० ला तिचे बाळंतपण होउुन अर्जदार क. २ ही मुलगी नामे यशस्वी जन्माला आली. तिचे बाळंतपण झाल्यानंतर तिने अनेकदा गैरअर्जदारांना भेटी करीता बोलाविले असता कोणीही तिला भेटायले आले नाही. शेवटी अर्जदार क. १ ने बाळंतपणानंतर अंदाजे ४ महीन्यांनी गैरअर्जदार क. १ कडे नांदविण्याच्या दृष्टीने घ्यायावयास बोलाविले तेव्हा गैरअर्जदार क. १ ने न येता त्याचे आईवडीलांना अर्जदारांना घ्यायावयास पाठविले. त्यानंतर अर्जदार क. १ ही अर्जदार क. २ ला घेवुन गैरअर्जदारांकडे नांदावयास गेली. तेव्हा तिने घरातील संपुर्ण कामधंदा करावा अशी गैरअर्जदारांची अपेक्षा होती. पंरतु अर्जदार क. १ ला लहान बाळ असल्यामुळे तिला घरातील संपुर्ण कामधंदा करणे अशक्य होते. त्यामुळे गैरअर्जदार क. १ चे वडील व आई गैरअर्जदार क. २ व ३ हे तिचा शारिरीक मानसीक व आर्थिक छळ करीत होते व गैरअर्जदार क. १ हा सर्व बांबीकडे दुर्लक्ष करीत होता. एवढेच नव्हेतर गैरअर्जदार क. १ हा घरामध्ये जीवनावश्यक वस्तु सुध्दा आणित नव्हता. त्यामुळे गैरअर्जदारांना बरेचदा उपाशी सुध्दा राहावे लागत होते. गैरअर्जदार क. १ चे आईवडील अर्जदार क. १ विषयी गैरअर्जदार क. १ कडे चुगल्या लावत असे. गैरअर्जदार क. १ सुध्दा तिला मानसीक व शारिरीक त्रास देत होता. सर्व ही गैरअर्जदार हे कौटुंबिक कट करुन अर्जदार क. १ ला घराच्या बाहेर हाकलण्याचा सतत प्रयत्न करीत असे. एवढेच नव्हेतर अर्जदार क. १ ला लहान बाळ असतांनाही तिने शेतीचे कामावर जावे याकरीता तसेच तिने अर्जदार क. २ ला घेवुन तिचे माहेरी निघुन जावे याकरीता प्रयत्न करीत होते. गैरअर्जदार हे तिला सतत म्हणत असे की, जर अर्जदार क. १ ही बाळाला घेवुन माहेरी जात नसेल तर तिच्या जीवाचे कमी जास्त झाल्यास आम्ही जबाबदार

राहणार नाही. शेवटी गैरअर्जदार क. १ ने तिचे माहेरी निरोप पाठवुन तिच्या भावास घ्यायवास बोलाविले. त्यामुळे तिचा भाउ राजेंद्र वघाळे हा दि. ०८.०२. २०२१ रोजी नरखेड येथे आला व गैरअर्जदारांना समजाविण्याचा प्रयत्न केला. परंतु गैरअर्जदार हे ऐकुण घेण्याच्या मनस्थीतीत नव्हते. शेवटी अर्जदार क. १ ला बळजबरीने तिच्या इच्छेविरुध्द लहानबाळासह माहेरी पाठवुन दिले. तेव्हा पासुन ती तिच्या लहान बाळाला घेवुन माहेरी शेघाट (मलकापुर) येथे राहत आहे. यानंतर गैरअर्जदारांनी तिला नांदविण्याच्या दृष्टीने कोणताही प्रयत्न केला नाही. शेवटी तिने तिच्या वकीलामार्फत नोटीस पाठवीली व नांदविण्यास घेवुन जावे असे कळविले. तरी पंरतु गैरअर्जदारांकडील कोणीही अर्जदारांना नांदविण्याच्या दृष्टीने घेण्याकरीता आले नाही व खोटेनाटे नोटीसचे उत्तर पाठविले इत्यादी कौटुंबिक हिंसाचाराच्या बाबी शपथेवरील अर्जामधे नमूद आहेत. अर्जदाराने दस्तयादी नि. क. ०३ सोबत दाखल केलेले दस्ताऐवज म्हणजे तिने तिचे वकीलसाहेब डबलु आर खासबागे यांच्या मार्फतीने दि. १४.०२.२०२२ रोजी पाठविलेल्या नोटीसाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, गैरअर्जदार क. १ ने अर्जदार क. १ ला नांदविण्याच्या दृष्टीने आपला अभिप्राय कळवावा असे कथन केले आहे तर सदर नोटीसाला गैरअर्जदार क. १ ने त्यांच्या वकीलामार्फतीने सदर नोटीसचे उत्तर देवून अर्जदाराने साक्षीदारसमक्ष चांगला वागणुकीचा लेख लिहुन नांदविण्यास यावे असे कळविले. यावरुन असे दिसुन येते की, अर्जदार क. १ ला गैरअर्जदारांकडे नांदावयाचे असल्याने तिने तिच्या वकीलामार्फतीने नोटीस दिली आहे. अर्जदाराचा शपथेवरील अर्जातील कथनाचा विचार केला असता गैरअर्जदारांनी तिला कौटुबिक कट रचुन घराच्या बाहेर हाकलण्याचा प्रयत्न केल्याने तिच्यावर शारिरीक, मानसीक व आर्थीक छळ केल्याचे दिसुन येते. तसेच सदरच्या अर्जासोबत दाखल केलेला कौटुंबिक घटना अहवालाचे अवलोकन केले

असता त्यामध्ये देखील सदरहु कौटुंबिक हिंसाचा-याच्या बाबी दिसुन येतात. अशाप्रकारे अर्जदाराचा शपथेवरील अर्ज व कौटुंबिक घटना अहवाल यावरुन असे प्रथमदर्शनी दिसुन येते की गैरअर्जदारांनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केला आहे. त्यामुळे मी मुद्दा क. १ चे उत्तर **होकारार्थी** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क. ०२ करीता</u>**

८. अर्जदाराने तिला व तिच्या मुलीला दरमहा पोटगी रक्कम रूपये ५ हजार प्रत्येकी मिळण्याकरीता विनंती केली. तिच्या म्हणण्यानुसार ती व तिची मुलगी तिचे माहेरी तिच्या आईवडिलांकडे राहत असुन आईवडीलांच्या दयेवर जिवन जगत आहे. तिच्याकडे कोणत्याही उत्पन्नाचे साधन नाही. तर गैरअर्जदारांकडे ३ एकर ओलीताखाली शेती असुन ६०० मोंसबीची बहर देणारी झाडे आहे. एवढेच नव्हेतर गैरअर्जदार हे दुस-याचे शेत वाहतात. त्या शेतामध्ये कापुस व तुर इ. पिके दरवर्षी घेतात. गैरअर्जदार क. १ ते ३ हे दरवर्षी ७ लाख रुपये शेतीचे उत्पन्न मिळवतात. जेव्हा की, सदरच्या बाबी गैरअर्जदाराने पुर्णतः नाकारलेल्या आहेत. अर्जदाराने अभिलेखात दाखल केलेले दस्तयादी नि.क. १९ सोबत दाखल केलेले भुमापन क. ४२५, ४३४, ४४१ च्या सातबारा उता-याचे अवलोकन केले असता गैरअर्जदार क. २ च्या नावे इतर सह हिस्सेदारांसह शेतजमिन असल्याचे दिसुन येते व सदरहू शेतजमिन कापुस संत्री इ. पीक देणारी असल्याचे देखील दिसुन येते म्हणजेच गैरअर्जदारांकडे पुरेसे उत्पन्नाचे साधन आहे. गैरअर्जदार क. १ हा ३६ वर्षाचा धस्टपुष्ठ इसम असुन गैरअर्जदार क. २ च्या नावे इतर सह हिस्सेदारांसह संत्रा, कापुस अशी पिके देणारी शेतजमिन असल्याने गैरअर्जदार क. २ व ३ च्या पालणपोषणाची जबाबदारी गैरअर्जदार क. १ वर नाही. गैरअर्जदारांनी त्यांचे लेखी उत्तर नि.क १७ मध्ये परिच्छेद क. १३ मध्ये असे कथन केले की, गैरअर्जदार क. १ हा मोलमजुरीची कामे करतो

म्हणजेच गैरअर्जदार क. १ हा कमावता असून त्याचे कडे उत्पन्नाचे साधन आहे. अर्जदार क. १ ही गैरअर्जदार क १ ची पत्नी असून अर्जदार क. २ ही त्यांची मुलगी आहे. त्यामुळे अर्जदारांच्या पालनपोषणाची जबाबदारी ही गैरअर्जदार क १ ची आहे. अशा परिस्थीतीत गैरअर्जदार क. १ कडे असलेले उत्पन्नाचे साधनाचा विचार करता माझे मते, गैरअर्जदार क. १ ने अर्जदार क. १ ला दरमहा रू. ३,००० (तीन हजार रूपये) व अर्जदार क. २ ला रू. २,००० (दोन हजार रूपये) या अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत पोटगीदाखल आर्थिक सहाय देणे न्यायोचित राहील.

९. अर्जदाराने तिला घरभाडे म्हणुन ५ हजार रुपये मंजुर करण्यात यावे अशी विनंती केली. पंरतु अर्जदाराने तिच्या अर्जात व कौटुंबिक घटना अहवाल नि.क. २० मध्ये ती तिच्या माहेरी आईवडीलांकडे राहत असल्याचे सांगीतले आहे. म्हणजेच तिला तिच्या आईवडीलांकडे माहेरी राहण्याची व्यवस्था आहे. अर्जदाराने ती कोणाकडे भाडयाने राहते याबाबतीत योग्य तो पुरावा सादर केलेला नाही. अशा परिस्थीतीत याक्षणी अर्जदार ही वेगळे घ ारभाडे मिळण्याच्या आदेशास पात्र नाही. तर सदरहु बाब दोन्ही पक्षांचे साक्षी पुराव्याअंती निश्चीत केल्या जाईल. त्यामुळे मी मुद्दा क २ चे उत्तर **अशंत : होकारार्थी** नोंदवित असुन मुद्दा क ३ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराने महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायदयाचे कलम २३ अंतर्गत दाखल केलेला अर्ज नि.क ०५ अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदारांनी अर्जदारांच्या विरुध्द कोणत्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार करु नये असा अंतरिम संरक्षण आदेश अर्जदारांना देण्यात येतो.

३. गैरअर्जदार क. १ ने सदर अर्ज दाखल झाल्याच्या तारखेपासुन अर्जदार क. १ ला दरमहा रु. ३,०००/- (रुपये तीन हजार) व अर्जदार क. २ ला दरमहा रु. २,०००/- (रुपये दोन हजार) या प्रकरणाचा अंतीम निकाल लागेपर्यंत पोटगी दाखल आर्थिक सहाय म्हणुन दयावे असा अंतरिम आदेश देण्यात येतो.

४. या आदेशाची प्रत दोन्ही पक्षांना, पोलीस स्टेशन, शेघाट व संरक्षण अधिकारी, वरुड यांना विनामुल्य देण्यात यावी.

दिनांक ०१.१०.२०२२

MANBINDU BAGADE

Digitally signed by MANBINDU BAGADE
Date: 2022.10.03 12:39:05 +0530

(एम.आर. बागडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
वरूड